**नियमीत दिवाणी दावा कमांक ५९/२०१४**

**निशाणी १९ खाली आदेश**

**(दिनांक २८ एप्रिल २०१५ रोजी पारीत केला )**

१ वादीने सदर अर्ज दावा मिळकतीची पाहणी करण्यासाठी न्यायालयीन आयुक्तांची नेमणूक करण्यात येउन अहवाल सादर करण्यासाठी दिलेला आहे.

२ वादींचे संक्षिप्त कथन खालीलप्रमाणे:

दावा मिळकतीमधील वादी, प्रतिवादींच्या शेतजमीनीस पाणी पुरवठा करण्यासाठी दोन इलेक्ट्रीक मोटर व दोन पी.व्ही.सी. पाईपलाईन टाकण्यात आलेल्या आहेत. पी.व्ही.सी. पाईपलाईनमध्ये वादींचा व प्रतिवादींचा प्रत्येकी अर्धा हिस्सा आहे. उपरोक्त पाईपलाईन करण्यासाठी वादींनी त्यांच्या अर्ध्या हिश्श्याची रक्कम प्रतिवादीस दिलेली आहे आणि अशा प्रकारे उपरोक्त पाईपलाईन मध्ये वादींचा मालकी हक्क आहे. मौजे मगरवाडी येथील जमीन गट क्र. ३५२/३ मध्ये वादीने घर बांधलेले आहे. ही मिळकत वादींच्या मालकीच्या शेतजमीनीत असल्यामुळे या घर मिळतीशी प्रतिवादींचा कसलाही हक्क हितसंबंध नाही. वादींच्या संमतीने प्रतिवादी या घरात राहत असून गट क्र. ३५२/२ ही प्रतिवादी क्र. २ ची शेतजमीन आहे. त्यामध्ये कधीही घर नव्हते व नाही. प्रतिवादी उपरोक्त नमूद गट क्र ३५२/३ मधील घरावर मालकी सांगत आहे. त्यामुळेच जमीन गट क्र. ३५२/२ व ३५२/३ याठिकाणी प्रत्यक्ष जागेवर जावून पाहणी होणे आवश्यक आहे. उपरोक्त नमूद पाईपलाईन व्दारे पाणी वादीच्या मोजे तारापूर येथील गट क्र २२३ व गट क्र २२४ मधील शेतजमीनीमध्ये व मौजे मगरवाडी येथील गट क्र. ३५४/२ व ३५२/३ या जमीनीस पाणी पुरवठा करण्यात येतो. सबब दावा मिळकतीची न्यायालयीन आयुक्तामार्फत पाहणी केल्यास उपरोक्त बाब अभिलेखावर येण्यास मदत होईल. त्यामुळेच पाईपलाईनव्दारे पाण्याचा पुरवठा कशा प्रकारे आणि कोणकोणत्या शेत जमीनीस करण्यात येतो आणि घरजागा नेमकया कोणत्या जमीनीत आहे याबाबी

अभिलेखावर येण्यासाठी न्यायालयीन आयुक्तांची नेमणून करुन दावा मिळकतीची पाहणी करण्यात यावी आणि अहवाल मागविण्यात यावा यासाठी वादीने हा अर्ज सादर केला आहे.

३. प्रतिवादीतर्फे निशाणी ३० नुसार अर्ज निशाणी १९ वरील कथनास आक्षेप घेण्यात आला. त्यांच्या कथनानुसार दोन इलेक्ट्रीक मोटारबाबत व पाईपलाईन बाबत व यामध्ये वादींचा हिस्सा आहे व त्याने रक्कम दिलेली आहे या बाबत वादीँ वादपत्रात कसलेही कथन केलेले नाही आणि वादींनी केवळ पुरावा तयार करण्यासाठी हा अर्ज दिलेला आहे. पुरावा गोळा करण्यासाठी न्यायालयीन आयुक्तांची नेमणूक करता येणार नाही. प्रतिवादीने स्वखर्चाने दोन्ही इलेक्ट्रीक मोटारी व पाईपलाईन यांची खरेदी केलेली आहे. त्यामुळेच वादींची मागणी मान्य करता येणार नाही. तसेच वादीने कोणत्या क्षेत्रात किती उस लावलेला आहे याची देखील पाहणी व्हावी असे या अर्जात नमूद केलेले आहे. तसेच प्रतिवादी क्र २ ने गट क्र ३५२/२ मध्ये १५ वर्षापूर्वी घराचे आर सी सी बांधकाम केलेले आहे. त्यामुळेच न्यायालयीन आयुक्तांच्या नेमणूकीची मागणी हा देखील पुरावा गोळा करण्याचा प्रकार आहे. त्यामुळे न्यायालयीन आयुक्तांच्या नेमणूकीची आवश्यकता नाही. त्यामुळेच अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा अशी प्रतिवादींनी विनंती केली.

४. प्रकरणाची कागदपत्रे अभ्यासली. वादींचे विद्वान वकील श्री. एम. बी गाजरे व प्रतिवादींचे विद्वान वकील श्री. आर. टी. कोष्टी यांचा युक्तीवाद ऐकला. त्यावरुन मी खालील मुद्दे निश्चित केले आणि कारणेमिमांसेसह त्यांचे निष्कर्ष खालीलप्रमाणे

| | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | अर्ज निशाणी १९ मंजूर करुन दावा मिळकतीची पाहणी करण्यासाठी न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक करुन मिळण्यास वादी पात्र आहेत का? | ... | **''नकारार्थी''** |
| २. | काय आदेश ? | ... | **''अंतिम आदेशाप्रमाणे''** |

## : कारणे मिमांसा :

**मुददा क १**

५ या प्रकरणाची वस्तुस्थिती पाहता वादींनी तुर्तातुर्त मनाई आदेश मिळण्यासाठी निशाणी ५ सादर कलेला आहे आणि या अर्जाच्या युक्तिवादाच्या वेळी वादींतर्फे निशाणी १९ बाबत युक्तिवाद करण्यात आला. एकंदर प्रकरणाची वस्तुस्थिती पाहता वादीनी हा दावा केवळ निरंतर मनाई आदेश मिळण्यासाठी व गेल्या तीन वर्षातील उसाबाबतची रक्कम प्रतिवादीकडून वसूल करुन मिळावी यासाठी दाखल केलेला आहे.

६. वादींच्या मागणीप्रमाणे दावा मिळकतीमधील दोन इलेक्ट्रीक मोटार व पाईपलाईन याबाबत वस्तुस्थितीदर्शक अहवालासाठी न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक करुन मागितले आहे. वादींच्या कथनानुसार या मोटारी व पाईपलाईनमध्ये त्यांचा अर्धा हिस्सा आहे. तर प्रतिवादीच्या कथनानुसार या दोन्हीही बाबी त्याच्या एकटयाच्या खरेदीच्या आहेत. सबब या बाबींच्या अस्तित्वाविषयी वाद दिसून येत नाही तर मालकीबाबत वाद दिसतो. यासाठी न्यायालयीन आयुक्तांच्या नेमणूकीची कसलीही गरज नाही.

७. तसेच सदर पाईपलाईनव्दारे पाणी पुरवठा कोणत्या कोणत्या शेतजमीनीत करण्यात येतो आणि गट क्र. ३५२/२ मधील घर वादीच्या मालकीचे आहे आणि या बाबी पडताळण्यासाठी न्यायालयीन आयुक्तांची नेमणूक करण्यात यावी असे वादींचे कथन आहे. मात्र केवळ पुरावा गोळा करण्यासाठी न्यायालयीन आयुक्तांची नेमणूक करता येत नाही हे कायदयाचे प्रस्थापीत तत्व आहे. त्यामुळेच वादींना न्यायालयीन आयुक्तांकरवी पुरावा गोळा करता येणार नाही. या उलट वादींना उपरोक्त बाबी सिध्द करण्यासाठी स्वतंत्र असा पुरावा अभिलेखावर आणता येईल.

८ वादींचा दावा हा मुख्यत: निरंतर ताकीद आदेशाबाबत आहे तरी देखील अशा प्रकारच्या दाव्यामध्ये न्यायालयीन आयुक्तांची नेमणूक दावा मिळकतीची व बांधकामाची पाहणी करण्यासाठी करता येईल आणि त्याला पुरावा गोळा करणे असे म्हणता येणार नाही असा युक्तिवाद वादीचे विद्वान वकील श्री. एम. बी. गाजरे यानी केला. त्यांच्या युक्तिवादाच्या समर्थनार्थ त्यांनी सन्माननीय ओरिसा उच्च न्यायालयाचा सुबलकुमार डे विरुध्द पुर्णचंद्रगिरी व इतर , ए.आय.आर. १९८९ पान २१४ हा अधिनिर्णय सादर केला. सदर अधिनिर्णय अभ्यासला. प्रस्तुत प्रकरणामध्ये वादी त्यांची बाजू स्वतंत्र पुरावा सादर करुन सिध्द करु शकतात . तसेच घराबाबत व पाईपलाईनबाबतचा वाद हा मालकी हक्काबाबत दिसून येतो. वादींना याबाबत कागदोपत्री पुरावा सादर करता येईल. त्यासाठी न्यायलयीन आयुक्तांची नेमणूक करणे गरजेचे दिसत नाही. प्रस्तुत प्रकरणातील वस्तुस्थिती व अधिनिर्णयातील वस्तुस्थिती यामध्ये तफावत असल्याने उपरोक्त अधिनिर्णय या प्रकरणाच्या वस्तुस्थितीला लागु होणार नाही.

अशा प्रकारे वादी स्वतंत्र पुराव्यानिशी अर्ज निशाणी १९ मध्ये नमूद केलेल्या बाबी सिध्द करु शकत असल्यामुळे आणि प्रकरणाची वस्तुस्थिती पाहता दावा मिळकतीची पडताळणी व निरीक्षण करण्यासाठी न्यायालयीन आयुक्तांची नेमणूक करण्याची गरज दिसत नाही. त्यामुळे प्रकरणाची वस्तुस्थिती पाहता मी मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देतो.

**मुददा क २**

९. सबब प्रकरणाची वस्तुस्थिती व दोन्ही पक्षांचा युक्तीवाद आणि मुददा क्र १ चे नकारार्थी निष्कर्ष पाहता निशाणी १९ खर्चासह नामंजूर करणे न्यायसंगत राहिल. सबब मी मुददा क्र २ चे उत्तर खालीलप्रमाणे देतो.

**आदेश**

१ अर्ज निशाणी १९ खर्चासह नामंजूर करण्यात आला.

दिनांक — २८.०४.२०१५

(हे. भा. सिरसाळकर)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर पंढरपूर